(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

<u>वनजमिन-ठाणे व पालघर</u>

**वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मे.गुजरात गॅस कंपनी लिमिटेड, गांधीनगर यांना भिवंडी व वसई तालुका क्षेत्र आणि सभोवतालच्या परिसरात नैसर्गिक वायू वितरण नेटवर्क उभारणेकामी १२ इंच व्यासाची स्टील पाईपलाईन टाकण्याकरीता ०.६८१८ हेक्टर वनक्षेत्र वळतेकरणाबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१२अ१८/प्र.क्र.३०२/फ-१०**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: ०२/०१/२०१९

**<u>प्रस्तावना :-</u>**

मे.गुजरात गॅस कंपनी लिमिटेड, गांधीनगर, गुजरात यांनी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत भिवंडी व वसई तालुका क्षेत्र आणि सभोवतालच्या परिसरात नैसर्गिक वायू वितरण नेटवर्क उभारणेकामी १२ इंच व्यासाची स्टील पाईपलाईन टाकण्याकरीता ठाणे व पालघर जिल्ह्यातील एकूण ०.६८१८ हेक्टर वनक्षेत्र वळतेकरणाचा प्रस्ताव राज्य शासनाच्या वन विभागास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या सविस्तर छाननीअंती प्रस्तावास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन आदेश:-</u>**

केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे आदेश क्रमांक, एफ.नं.११-९/९८-FC, दिनांक १६/१०/२००० आणि ०७/११/२०१४ अन्वये राज्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, भिवंडी व वसई तालुका क्षेत्र आणि सभोवतालच्या परिसरात नैसर्गिक वायू वितरण नेटवर्क उभारणेकामी १२ इंच व्यासाची स्टील पाईपलाईन टाकण्याकरीता ठाणे व पालघर जिल्ह्यातील एकूण ०.६८१८ हेक्टर वळती करण्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/एनसी/२/आयडी-१२६१५/(६३)/१५२३/२०१८-१९, दिनांक ०१/११/२०१८ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास **<u>तत्त्वत: मंजूरी</u>** देत आहे. वनजमिनीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| अनु.क्र. | गावाचे नाव | तालुका | जिल्हा | सर्व्हे नंबर | वनक्षेत्र (हेक्टर मध्ये) | वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अंबाडी | भिवंडी | ठाणे | ११० | ०.०२०७ | संरक्षित वने |
| २. | आकोली | भिवंडी | ठाणे | १२७/अ | ०.०४४१ | संरक्षित वने |
| | | | | १९८ | ०.०२२५ | राखीव वने |
| ३. | गणेशपुरी | भिवंडी | ठाणे | ८७/११ | ०.०११२५ | संरक्षित वने |
| | | | | १०७ | ०.०१०३५ | राखीव वने |
| ४. | भिवाली | भिवंडी | ठाणे | ५१ | ०.०४०५ | राखीव वने |
| ५. | Usgaqon | भिवंडी | ठाणे | १३३ | ०.००९९ | संरक्षित वने |
| | | | | १३० | ०.०१००८ | संरक्षित वने |
| ६. | सव्यान तर्फे घाटेघर | वसई | पालघर | ९५ | ०.०१८ | संरक्षित वने |
| | | | | ८८ | ०.०१४८५ | संरक्षित वने |
| | | | | १३३ | ०.०१३१४ | संरक्षित वने |
| | | | | १३० | ०.००४०५ | संरक्षित वने |
| | | | | ९२ | ०.००४५ | संरक्षित वने |
| | | | | ९० | ०.००७२ | संरक्षित वने |
| | | | | १७९ | ०.००३१५ | संरक्षित वने |
| ७. | शिरवली | वसई | पालघर | १०७ | ०.०१४८५ | संरक्षित वने |
| ८. | शिवनसई | वसई | पालघर | ९७ | ०.००५८५ | संरक्षित वने |
| | | | | ७७ | ०.००४५ | संरक्षित वने |
| ९. | ऊसगांव | वसई | पालघर | १२२ | ०.०६०३ | संरक्षित वने |
| १०. | पारोल | वसई | पालघर | १३१ | ०.०१२६ | संरक्षित वने |
| | | | | १२२ | ०.०३३०३ | संरक्षित वने |
| ११. | मांडवी | वसई | पालघर | ७९ | ०.००१०८ | संरक्षित वने |
| | | | | ७५ | ०.०११७ | तुंगारेश्वर अभयारण्य अंतर्गत घोषित राखीव वने |
| | | | | ५५ | ०.०२०२५ | कलम ३५ |
| | | | | ७७ | ०.०१३२३ | कलम ३५ |
| | | | | ७८ | ०.०१६२ | कलम ३५ |
| | | | | ८० | ०.००२२५ | संरक्षित वने |
| | | | | ८५ | ०.००८५५ | संरक्षित वने |
| १२. | शिरसाड | वसई | पालघर | ७६ | ०.०१०८ | संरक्षित वने |
| | | | | ९४ | ०.००४९५ | कलम ३५ |
| १३. | टोक्रे | वसई | पालघर | ७२ | ०.०२९८८ | संरक्षित वने |
| | | | | ४५ (जुना १९७) | ०.०३२९४ | तुंगारेश्वर अभयारण्य अंतर्गत घोषित राखीव वने |
| १४. | खैरापाडा | वसई | पालघर | ६८ | ०.०५४२७ | संरक्षित वने |
| | | | | ७ | ०.०५५४४ | संरक्षित वने |
| १५. | शिरगांव | वसई | पालघर | ४०२ | ०.०५४९ | राखीव वने |
| **एकूण वनक्षेत्र (हेक्टर मध्ये)** | | | | | **०.६८१८** | |

२. सदर तत्वत: मंजूरी खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

२) मौजे-भिवली, तालुका-भिवंडी, जि.ठाणे येथील कंपार्टमेंट नंबर-५२ मधील १.०० हेक्टर अवनत वनक्षेत्रावर प्रकल्प यंत्रणेस स्व:खर्चाने पर्यायी वनीकरण करावे लागेल.

३) प्रकल्प प्रस्तावामध्ये ज्या कारणासाठी वनजमिन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

४) भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प यंत्रणेस ०.६८१८ हेक्टर वनक्षेत्राकरीता अनुज्ञेय नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरणे बंधनकारक राहील.

५) केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार/ सुधारित दरानुसार प्रकल्प यंत्रणेस नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरावी लागेल.

६) पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित क्षेत्राचे सर्व्हेक्षण, सीमांची आखणी व निश्चिती, कायमस्वरुपी खांब उभारणे इत्यादींचा खर्च प्रकल्प यंत्रणेस अदा करावा लागेल.

७) रस्त्याच्या कडेने पाईपलाईन टाकण्याकरीता संबंधित सक्षम प्राधिकरणाची पूर्व परवानगी प्राप्त करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

८) आवश्यक असल्यास सक्षम प्राधिकरणाव्दारे पर्यावरणीय मंजूरी प्राप्त करुन घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

९) प्रस्तावित वनक्षेत्रातून नैसर्गिक वायूची पाईपलाईन पुरेश्या सुरक्षिततेच्या उपायांसह प्रमाणित मानकांनुसार भूपृष्ठापासून खोलवर टाकली जाईल.

१०) प्रस्तावित प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक असणा-या साधनसामुग्रीची ने-आण करणेसाठी वनक्षेत्रात कोणताही अतिरिक्त/ नवीन रस्ता तयार करण्यात येऊ नये.

११) प्रकल्पाचे काम करतेवेळी मजूर व इतर कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्रातील वनस्पती व प्राणी यांना हानी पोहचणार याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

१२) वळतेकरणाकरीता प्रस्तावित क्षेत्रात प्रकल्प यंत्रणेस वृक्षतोड करता येणार नाही.

१३) प्रकल्पास अंतिम मान्यता मिळण्यापूर्वी प्रकल्प यंत्रणेने अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत विहित नमुन्यातील आवश्यक प्रमाणपत्राची पूर्तता करावी.

१४) प्रकल्पाकरीता प्रस्तावित क्षेत्र तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्याच्या सीमेपासून १० कि.मी.आतील अंतरावर आहे. मौजे- टोक्रे, ता.वसई, जि.पालघर येथील प्रस्तावित ०.०६२७ हेक्टर क्षेत्र

तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यात समाविष्ट असल्याने, केंद्र शासनाच्या दिनांक १९/१२/२०१२ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन प्रकल्प यंत्रणेस राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची पूर्व परवानगी प्राप्त करणे बंधनकारक राहील.

१५) प्रकल्प यंत्रणेने उक्त प्रकल्पास लागू असण्या-या सर्व संबंधित कायद्यांतील तरतुदी, नियम व मार्गदर्शक सूचना यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

१६) उपरोक्त नमूद केंद्र शासनाच्या पत्रातील अटी व शर्तींच्या अधीन राहून ही तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे व त्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक असेल.

१७) वन विभागाने घातलेल्या सर्व अटी प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक राहतील.

१८) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे परवानगीशिवाय प्रस्तावित वनजमिनीवर काम सुरुवात करण्यात येऊ नये.

१९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना योग्य वाटतील अशा इतर अटी.

२०) प्रकल्प यंत्रणेने उपरोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त प्रयोजनासाठी वनजमिन वळतीकरणास अंतिम मंजूरी प्रदान करील आणि मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे हे वरील पूर्तता झाल्यानंतर प्रत्यक्षात वनजमिन वळतीकरणाची कार्यवाही करतील.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०१०२१४२८१३९५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2019.01.02 14:38:33 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रत,**

१. सचिव, पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर.

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. विभागीय आयुक्त, कोकण.
८. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर.
९. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.
१०.जिल्हाधिकारी, ठाणे.
११.जिल्हाधिकारी, पालघर.
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे.
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर.
१४.उपवनसंरक्षक, ठाणे.
१५.मे.गुजरात गॅस कंपनी लिमिटेड, २ शांतीसदन सोसायटी, परिमल गार्डन जवळ, एलिसब्रीज, अहमदाबाद, गुजरात-३८० ००६.
१६.निवडनस्ती (फ-१० कार्यासन).

**<u>Forest Land- Thane & Palghar</u>**
**Diversion of 0.6818 Ha. of Forest land in Thane & Palghar district under Forest (Conservation) Act, 1980 in favour of M/s Gujarat Gas Company Limited, Gandhinagar for laying of 12" diameter Steel Pipeline to set up Natural Gas Distribution Network in Bhiwandi & Vasai Taluka & its surrounding area.**

## Government of Maharashtra

### Revenue and Forest Department

### Government Order No.: FLD-12A18/CR-302/F-10

Mantralaya, Mumbai-400 032

Date: 02/01/2019

**<u>Preamble:-</u>**

M/s Gujarat Gas Company Limited, Gandhinagar, Gujarat has submitted a proposal for diversion of 0.6818 Ha. of Forest land in Thane & Palghar district under Forest (Conservation) Act, 1980 for laying of 12" diameter Steel Pipeline to set up Natural Gas Distribution Network in Bhiwandi & Vasai Taluka & its surrounding area, to the State Forest Department. After careful scrutiny of the proposal, granting of in-principle approval to the aforesaid project is under consideration of the State Government.

**<u>Order:-</u>**

In exercise of powers delegated to the State Government, vide Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi's order F.No.11-9/98-FC, dated 16/10/2000 and dated 07/11/2014, Government of Maharashtra is pleased to grant **<u>in-principle approval</u>** to the diversion of 0.6818 Ha. Forest land in Thane & Palghar district under section 2 of the Forest (Conservation) Act, 1980, as per the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter no. Desk-17/NC/II/I.D.-12615/(63)/1523/2018-19, dated 01/11/2018 for laying of 12" diameter Steel Pipeline to set up Natural Gas Distribution Network in Bhiwandi & Vasai Taluka & its surrounding area. The details are as follows:-

| Sr.No. | Village Name | Tehsil | District | Survey Number | Forest Area (in Hectare) | Legal Status |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Ambadi | Bhiwandi | Thane | 110 | 0.0207 | PF |
| 2. | Akoli | Bhiwandi | Thane | 127/A | 0.0441 | PF |
| | | | | 198 | 0.0225 | RF |
| 3. | Ganeshpuri | Bhiwandi | Thane | 87/11 | 0.01125 | PF |
| | | | | 107 | 0.01035 | RF |
| 4. | Bhiwali | Bhiwandi | Thane | 51 | 0.0405 | RF |
| 5. | Usgaqon | Bhiwandi | Thane | 133 | 0.0099 | PF |
| | | | | 130 | 0.01008 | PF |
| 6. | Sayvan turf Ghateghar | Vasai | Palghar | 95 | 0.018 | PF |
| | | | | 88 | 0.01485 | PF |
| | | | | 133 | 0.01314 | PF |
| | | | | 130 | 0.00405 | PF |
| | | | | 92 | 0.0045 | PF |
| | | | | 90 | 0.0072 | PF |
| | | | | 179 | 0.00315 | PF |
| 7. | Shirvali | Vasai | Palghar | 107 | 0.01485 | PF |
| 8. | Shivansai | Vasai | Palghar | 97 | 0.00585 | PF |
| | | | | 77 | 0.0045 | PF |
| 9. | Usgaon | Vasai | Palghar | 122 | 0.0603 | PF |
| 10. | Parol | Vasai | Palghar | 131 | 0.0126 | PF |
| | | | | 122 | 0.03303 | PF |
| 11. | Mandvi | Vasai | Palghar | 79 | 0.00108 | PF |
| | | | | 75 | 0.0117 | RF (Declare Tungareshwar) |
| | | | | 55 | 0.02025 | 35 section |
| | | | | 77 | 0.01323 | 35 section |
| | | | | 78 | 0.0162 | 35 section |
| | | | | 80 | 0.00225 | PF |
| | | | | 85 | 0.00855 | PF |
| 12. | Shirsad | Vasai | Palghar | 76 | 0.0108 | PF |
| | | | | 94 | 0.00495 | 35 section |
| 13. | Tokre | Vasai | Palghar | 72 | 0.02988 | PF |
| | | | | 45 (Old 197) | 0.03294 | RF Declare Tungareshwar) |
| 14. | Khairapada | Vasai | Palghar | 68 | 0.05427 | PF |
| | | | | 7 | 0.05544 | PF |
| 15. | Shirgaon | Vasai | Palghar | 402 | 0.0549 | RF |
| **Total Forest Area (in Hectare)** | | | | | **0.6818** | |

2. <u>This in-principle approval is issued subject to the following conditions:-</u>

1) The legal status of the land will remain unchanged.

2) Compensatory Afforestation will be raised at the cost of the User Agency on 1.00 Ha. degraded forest land at Compartment No.52 of Village-Bhiwali, Tal.Bhiwandi, Dist.Thane.
3) The Forest land shall not be used for any purpose other than specified in the project.
4) The User Agency will defray the cost of Net Present Value of 0.6818 Ha. of Forest Land as per latest guidelines of Government of India.
5) The User Agency will defray the additional/ revised cost of Net Present Value as per latest guidelines of Government of India.
6) The User Agency will pay cost of survey, demarcation and erection of permanent pillars on the Compensatory Afforestation land.
7) The User Agency shall obtain the permission of concerned competent authority for laying of pipeline within the ROW.
8) The User Agency will obtain the Environmental Clearance from competent authority, if required.
9) The Natural Gas Pipeline will be laid well below as per the norms the ground level all along its length through forest and adequate safety measures to be adopted.
10) No additional or new path will be constructed inside the forest area for transportation of construction materials for the execution of the project work.
11) It will be the responsibility of the User Agency to ensure that the labourers, staffs engaged in construction activity do not damages nearby forest flora and fauna.
12) No tree shall be felled in the area proposed for diversion.
13) The User Agency will fulfill the complete compliance of the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forests Rights) Act, 2006 before final approval.
14) The proposed area falls within 10 KM's from the boundary of Tungareshwar Wildlife Sanctuary and area of proposed project at village-Tokre, Tal.Vasai, Dist.Palghar 0.0627 Ha. is included in Tungareshwar Wildlife Sanctuary. Hence, Project Authority has to obtain approval from National Board of Wildlife (NBWL), MoEF&CC, New Delhi as per GOI guidelines dated 19/12/2012.
15) Provision of all relevant Acts, Rules made there under and guidelines applicable to the project shall have to be strictly followed.
16) This in-principle approval is also subject to the terms and conditions mentioned in the Government of India's letter referred to here-in-above is binding on User Agency.
17) All the conditions stipulated by the Forest Department shall be binding on the User Agency.

18) No work should be started on the proposed forest land without prior permission of the Chief Conservator of Forests (T.), Thane.

19) Any other condition which Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur may impose.

20) The Final approval shall be granted by the State Government after fulfillment of the above conditions by the User Agency. The actual diversion of forest land shall be effected thereafter by the Chief Conservator of Forests (T), Thane.

3. This Government Order of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201901021428139519. This Order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Virendra
R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2019.01.02 14:39:56 +05'30'

**( Virendra Tiwari )**
**Additional Principal Chief Conservator of Forests**
**(Mantralaya)**

**Copy forwarded to:**

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central zone, Government of India, Nagpur.
3. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur.
4. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
5. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
7. Commissioner, Kokan Division.
8. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
9. Chief Conservator of Forests (T), Thane.
10. Collector, Thane.
11. Collector, Palghar.
12. Chief Executive Officer, Zilla Parishad, Thane.
13. Chief Executive Officer, Zilla Parishad, Palghar.
14. Deputy Conservator of Forests, Thane.
15. M/s Gujarat Gas Company Limited, 2 Shantisadan Society, Near Parimal Garden, Ellisbridge, Ahmedabad, Gujarat-380 006.
16. Select File-F-10.